INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 6.865 (SJIF 2023)

# राष्ट्रवीर साप्ताहिकाची स्थापना व वैचारिक भूमिका

# (Establishment and Ideological Role of Rashtraveer Weekly)

**प्रा. विशाल रामदास रोकडे**

इतिहास विभागप्रमुख
श्री मुलिकादेवी महाविद्यालय, निघोज,
ता. पारनेर, जि. अहमदनगर (महाराष्ट्र, भारत)
E-mail: vish.unipune@gmail.com

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/01.2023-67448141/IRJHIS2301006

**प्रस्तावना :**

बेळगाव व धारवाड परिसरातील बहुजन समाजाचा कळवळा असणाऱ्या प्रभृती यामध्ये भुजंगराव दळवी, शामराव संताजीराव भोसले, रावसाहेब देवराव, अण्णासाहेब बिरजे, कृष्णाजी बळवंतराव काकतीकर वकील, शामराव गोविंदराव देसाई आदी मंडळींनी बहुजन समाजासाठी वृत्तपत्र प्रसिद्ध करावे असे प्रयत्न सुरू केले व यासाठी काही निधी जमा केला. करवीरनिवासी राजर्षी शाहू महाराज यांनीही यापूर्वी बहुजन समाजाच्या वैचारिक जागृतीसाठी, उन्नतीसाठी वृत्तपत्र असावे या हेतूने अनेक वृत्तपत्रांस हातभार लावलेला होता. शाहू महाराजांची हीच वृत्तपत्रविषयक्ची असणारी आस्था ओळखून भुजंगराव दळवी यांनी प्रथम शाहू महाराजांशी संपर्क साधला. यानंतर शामराव देसाई व रावसाहेब बिरजे यांनी कोल्हापूर येथे येऊन आपल्या साप्ताहिकाच्या योजनेविषयी सविस्तर माहिती शाहू महाराजांना दिली. शाहू महाराजांनीही बेळगाव परिसरात सुधारणावादी वृत्तीने कार्य करू पाहणाऱ्या या मंडळींना सहाय्य करण्यास अनुकूलता दर्शविली व काहीकाळ याबाबत चर्चा करून या पत्रास अनुदानही दिले. भुजंगराव दळवी, शामराव भोसले, रावसाहेब बिरजे, काकतीकर वकील आणि शामराव देसाई या पाच सहकाऱ्यांनी 'छत्रपती शिवाजी प्रिंटिंग प्रेस असोसिएशन'ची स्थापना केली. यावेळी शामराव संताजीराव भोसले यांच्यावर सर्वानुमते प्रथम संपादकाची जबाबदारी सोपविण्यात आली.

९ मे १९२१ रोजी शिवजयंतीचा शुभमुहूर्तावर 'राष्ट्रवीर'चा पहिला अंक प्रसिद्ध झाला. राष्ट्रवीरद्वारे बहुजन समाजाच्या हिताच्या तथा चळवळीपर कार्यक्रमांना प्रसिद्धी मिळू लागली. 'राष्ट्रवीर' पत्रकाच्या पहिल्या पानावर सर्वात

शीर्षस्थानी मध्यभागी 'ब्राह्मणेतर पक्षाचे मुखपत्र' ही ओळ आहे. त्यानंतर खालोखाल पानाच्या मध्यभागी मराठी अक्षरांत 'राष्ट्रवीर नावाच्या मध्यात शिवाजी महाराजांची एकांगी अर्थ प्रतिमा' आहे तर या नावाच्या डावीकडे जाहिरातीचे दर तसेच उजवीकडे वर्गणीचे दर उद्धृत केलेले आहेत याखाली 'THE RASHTRA VEER' असे इंग्रजीत वर्तमानपत्राचे नाव ठळक अक्षरांत छापले आहे. त्याखाली इंग्रजी अक्षरांत 'The Organ of the Non-Brahman Party' असे वाक्य लिहिले आहे. त्याखाली संपादकाचे नाव- शामराव संताजीराव भोसले, बी.ए., एल.एल.बी. असे लिहिले तर शेवटी वर्ष १ले, बेळगाव- श्री राज्याभिषेक शक २४७, तारीख ९ माहे मे १९२१ अंक १ ला अशा ओळी उद्धृत केलेल्या आहेत यानंतरच प्रत्यक्षपणे अंकलिखाणास सुरुवात झालेली दिसून येते

**राष्ट्रवीरच्या स्थापनेची उद्दिष्टे :**

राष्ट्रवीर साप्ताहिकाचे उद्दिष्टे अथवा ध्येय हे राष्ट्रवीरच्या पहिल्या अंकातच संपादक तथा पत्र स्थापकांनी स्पष्ट केलेले आहे. यामध्ये ते लिहितात, "आमचे ध्येय, श्री शिवजयंतीसारख्या मंगलप्रसंगी राष्ट्रवीराचा पहिला अंक वाचकांच्या हाती देण्याचा सुयोग आलेला पाहून आम्हाला अतिशय आनंद होत आहे 'ब्राह्मणेतर पक्षाचे मुखपत्र' या दोन शब्दांवरूनच आमचे ध्येय काय आहे हे वाचकांस कळून येईलच. केवळ ब्राह्मणांच्या अन्यायाचा बिमोड करण्यासाठी राष्ट्रवीराने जन्म घेतलेला नसून, ज्या-ज्या व्यक्तीकडून अगर व्यक्तीसमूहाकडून अन्याय घडला असेल किंवा घडेल; त्या व्यक्तीस अगर समूहास अन्यायासहित समरांगणावर खेचून आणून त्यांचा पुरा परामर्श घेण्यासाठी व सुधारलेलीराष्ट्रे जे स्वातंत्र्यसुख अनुभवीतआहेत ते स्वातंत्र्य स्वदेशास ही प्राप्त होईल अशा मतांचा प्रसंग ओळखून जबाबदारपणे प्रसार करण्यासाठीच हा राष्ट्रवीर अवतरला आहे, हे लक्षात असू द्यावे." एकूणच 'शिवाजी आमुचा राणा, मराठी आमुचा बाणा' तसेच 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' अशी राष्ट्रवीर स्थापनेची सर्वंकष भूमिकाच पत्र संपादकांनी याठिकाणी मांडलेली दिसून येते.

**राष्ट्रवीरची वैचारिक भूमिका :**

राष्ट्रवीर साप्ताहिकाने पहिल्या अंकातूनच आपले ध्येय स्पष्ट केले होते. त्याप्रमाणेच या साप्ताहिकाने ब्राम्हणेत्तर चळवळीस व्यापक व्यासपीठ या पत्राच्या रूपाने निर्माण करून दिले. राष्ट्रवीर पत्राने नेहमीच सत्यशोधकीय विचारधारेचा अवलंब करून ब्राम्हणेत्तरांचे हित जोपासण्याचे कार्य केले. रवींद्रनाथ टागोर यांनी 'शिवाजी महाराजांचे कार्य म्हणजे वाळूचा दोर विणण्यासारखे होते तथा त्यांनी अशक्यप्राय असे कार्य केले' असे म्हटले आहे. त्याचा अर्थ असा की, मध्ययुगीन कालखंडात शिवरायांनी समाजाच्या तळागाळातील सर्वच मावळ्यांना हाताशी धरून स्वराज्याचे स्वप्न पूर्ण केले. त्यावेळी त्यांनी जात, धर्म, लिंग, पंथ या बाबींचा विचारही केला नाही व सर्वंकष समाजमन जपले. या वृत्तीनेच राष्ट्रवीरनेही कुठलाही भेदभाव न करता बहुजनांना वैचारिक धाग्यात गुंफण्याचे कार्य अतिशय जबाबदारीने पार पाडलेले

दिसून येते.

महात्मा जोतिराव फुले यांना जातिव्यवस्थेविरुद्ध बंड करणारा पहिला महामानव म्हणून ओळखले जाते. भारतातील जातिव्यवस्थेचा मूलाधार ठरलेली वर्णव्यवस्था ही मुळातच चुकीची आहे असे म्हणून त्यांनी या व्यवस्थेवर कठोर असे प्रहार केले. जोतीरावांना जुलूम, लाचलुचपत, लबाडीचे व्यवहार यांचा अतिशय तिटकारा होता म्हणून जे कामगारांना लुबाडतात, सरकारला फसवतात आणि राष्ट्रीय पुनर्रचनेच्या कार्यात भ्रष्टाचारी धोरण स्वीकारतात अशांच्या विरोधात त्यांनी आपली स्पष्ट मते मांडलेले आहेत. सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी जोतिरावांनी प्रामाणिक प्रयत्न केले. एकूणच जोतिरावांच्या याच विचारांचा वारसा घेऊन 'राष्ट्रवीर' अवतरला. राष्ट्रवीरने आपल्या लेखणीद्वारे सदैव सामाजिक समतेचा पुरस्कार केला. तसेच बहुजनाधिष्ठीत व्यवहार्य भूमिकांचा सदैव पाठपुरावा करत बहुजन समाजात प्रबोधनाचे बीज पेरले.

राजर्षी शाहू महाराजांनी बहुजन समाजाने वृत्तपत्रीय प्रबोधन क्षेत्रात पदार्पण करावे याकडे अधिक लक्ष दिले होते. कारण या वृत्तपत्र संस्थेच्या माध्यमातूनच प्रस्थापित वृत्तपत्रांना यशस्वीपणे प्रतिकारही करता येईल व प्रबोधनाचा अंश तळापर्यंत रुजेल अशी त्यांना खात्री होती. म्हणूनच बहुजन समाजात इंग्लिश आणि मराठी वृत्तपत्रे प्रसिद्ध व्हावीत यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. या उद्देशानेच त्यांनी ११ मे १९१८ रोजी 'पॉलिटिकल डिपार्टमेंट ऑफ दि गव्हर्नमेंट ऑफ बॉम्बे' या कार्यालयाचे वरिष्ठ अधिकारी मि. कर्टिस यांना वृत्तपत्र प्रसिद्ध करण्याबाबतीत आमची योजना असल्याचे स्पष्ट केले होते. एकूणच शाहू महाराजांनीही बहुजनवादी विचारधारा राष्ट्रवीरनेही अंगिकारलेली होती आणि याचवृत्तीने राष्ट्रवीरने आपल्या संपूर्ण हयातभर बहुजनवादाचा पुरस्कार करून'बहुजन प्रबोधन' हेच आपले ध्येय निश्चित केले होते असे दिसून येते.

राष्ट्रवीरने आपल्या संपूर्ण कार्यकाळात राष्ट्रीय, सत्यशोधकीय व बहुजनवादी विचारधारेचा अवलंब केला. या विचारधारेच्या धर्तीवर सर्वंकषता, समता, न्याय, हक्क, बंधुता व विशेषत्वाने मानवता या मूल्यांचा स्वीकार करून साकल्यसंपूर्ण असा विचार राष्ट्रवीरने अंगीकृत करून प्रबोधनास एक नवा आयाम देण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

**संदर्भग्रंथ:**

१. लेले रा.के., 'मराठी वृत्तपत्रांचा इतिहास', २००९, पृ.१०.

२. कानडे रा.गो., 'मराठी नियतकालिकांचा इतिहास(१८३२ ते १९३७)', १९३८.

३. राष्ट्रवीर, सुवर्ण महोत्सव विशेष अंक, १९७१.

४. राष्ट्रवीर, ९ मे १९२१.